# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ४११/२०२३ दिनांक – ०१/१२/२०२३

## Credit Card वरील International service बंद करण्याचे सांगुन केलेल्या फसवणुकीतील २,३०,०००/- रक्कम परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नयानगर परिसरातील इसम नामे श्री. मनिष आर विश्वकर्मा रा. मिरारोड पुर्व यांना अनोळखी इसमाने फोन करुन सांगितले की, ***"तुमच्या क्रेडिट कार्डावर इंटरनॅशनल सर्विस चालु असल्याने तुमचे एक्स्ट्रा चार्जेस कट होतात. सदर सर्विस बंद करावयाची असल्यास तुमच्या मोबाईलमध्ये क्रेडिट कार्डाचे अॅप डाऊनलोड करुन मी सांगत असलेली कारवाई करा".*** त्यानंतर तक्रारदार यांना त्यांचे मोबाईलवर मॅसेजद्वारे एक लिंक प्राप्त झाली. तक्रारदार यांनी लिंकवर क्लिक केले असता त्यांचे मोबाईलवर एक अनोळखी अॅप डाऊनलोड झाले. त्यानंतर तक्रारदार यांचे क्रेडिट कार्डाचे खात्यातुन २,५०,०००/- रु कपात झाल्याचा मॅसेज त्यांना प्राप्त झाला. सदरबाबत सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारी अर्ज प्राप्त करण्यात आलेला होता.

**(सायबर गुन्हे कक्ष आवक अर्ज क्रमांक – २८१४-बी/२०२३ दि. २८/११/२०२३)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांचे फसवणूक रक्कमेबाबत Croma Store कंपनीसोबत तात्काळ पत्रव्यवहार करुन **रक्कमेपैकी २,३०,०००/- रक्कम त्यांचे क्रेडिट कार्डाचे खात्यावर** परत मिळविण्यात आली आहे.

**<u>अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...</u>**

- **Credit Card संदर्भातील माहिती कोणाकडेही उघड करू नये**
- **आपले मोबाईलवर प्राप्त कोणतीही अनोळखी लिंकवर क्लिक करु नये.**
- **आपले मोबाईल फोन मध्ये कोणतेही अनोळखी अॅप डाऊनलोड करु नये.**
- **क्रेडीट कार्ड, डेबिट कार्डद्वारे, बँक खात्यातुन ट्रॅन्झॅक्शन झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, मपोअं/१३०८७ अमिना पठाण, मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी, पोअं/२२००३ कुणाल सावळे, यांनी पार पाडली आहे.

सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०
सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- **www.cybercrime.gov.in**

**----0000----**